





महाविद्यालयात राज्यशास्त्र विभाग व तहसिल कार्यालय हिमायतनगरच्या

वतीने आयोजित राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त मार्गदर्शन करतांना







राष्ट्रीय मतदार दिनामिमित्त मतदार जनजागरण रॅलीचे आयोजन




राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त मतदार जनजागरण रॅलीचे उद्घाटन करतांना नायब तहसीलदार आणि नगराध्यक्ष, प्राध्यापक वृंद




मतदार जनजागरण रॅलीचे क्षणचित्र



मलहार जनजागरण रॅलीतील सहभागी विद्यार्थी



मलहार जनजागरण रॅलीतील सहभागी विद्यार्थी







राज्यशास्त्र विभागाद्वारे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना VVPAT मशिन विषयी माहिती देतांना



हिमायतनगर : ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट मतदान मशीनचे प्रात्याक्षिक आयोजन करण्यात आले होते.

# व्हीव्हीपॅट मशीनचे प्रात्यक्षिक

हिमायतनगर : हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभाग आणि तहसिल कार्यालय हिमायतनगर यांच्या संयुक्त विद्यमाने ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट मतदान मशीनचे प्रात्याक्षिक आयोजन करण्यात आले. प्रात्यक्षिक पथक प्रमुख नायब तहसिलदार व्ही. पी. राठोड यांनी मतदान मशीन बाबत सविस्तर मार्गदर्शन करून महाविद्यालयीन विध्यार्थ्यांना प्रात्याक्षिक दाखवण्यात आले. प्रात्याक्षिक कार्य संपन्न करण्यासाठी मंडळ अधिकारी कंधारे, तलाठी रुपेश जाधव, मास्टर ट्रेनर व्ही. एन. पाटील आदी कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. या प्रात्याक्षिक कार्यक्रमास महाविद्यालयातील डॉ. डोंगरे एल. बी., डॉ. कदम डी. के., डॉ. वसंत कदम, प्रा. गुडाळे, एम. पी. प्रा. महेश वाखरडकर, डॉ. माने कोलेवाड, देशपांडे नगारे, चंदापुरे यांच्यासह विध्यार्थी विध्यार्थीनी उपस्थित होते.



हिमायतनगर न्यायालयाला भेट



हिमायतनगर न्यायालयात कायदे विषयक मार्गदर्शनास
उपस्थित राज्यशास्त्र विभागाचे विद्यार्थी

लोकमत
शुक्रवार २८.१.२०२२
हॅलो नांदेड
epaper.lokmat.com

# राष्ट्रीय मतदार दिवस साजरा

लोकमत न्यूज नेटवर्क

**हिमायतनगर :** हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र विभागाच्या वतीने राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्या डॉ. उज्वला सदावर्ते व प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ.हरी वंगरवार, डॉ.डोंगरे ,डॉ.डी. के. कदम, डॉ, शिवराज बोकडे हे उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. एल. बी. डोंगरे यांनी केले. डॉ.हरी वंगरवार म्हणाले ,भारतीय लोकशाहीला सदृढ बनवण्यामध्ये मतदार आणि मतदान महत्त्वाचे आहे. मतदानाच्या अधिकाराचा उचित वापर करून आदर्श व बुद्धिमान प्रतिनिधी निवडून सभागृहात पाठवल्यास देश वैभवशाली होईल.सूत्रसंचालन डॉ. शिवाजी भदरगे यांनी केले तर आभार प्रा. पंडित हाके यांनी मानले.






महाविद्यालयात मतदार ओळखपत्राशी आधार जोडणी संबंधी
कार्यशाळेचे आयोजन




राज्यशास्त्र विभागाचा राठोड ईश्वर नथ्थू हा विद्यार्थी राज्यशास्त्र विषयात SET ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे अभिनंदन करतांना.





महाविद्यालयात तालुका न्यायालयद्वारा आयोजित कायदेविषयक शिबीरात
मार्गदर्शन करतांना

प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक



सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

संभाजीनगर, सातारा, सोलापूर, अहमद

www.tarunbharat.org

र, २८ नोव्हेंबर २०२१ ◂◂ युगाब्द ५१२२ ◂◂ पाने ८ ◂◂ वर्ष ४ थे

## भारतीय संविधान हे समाज परिवर्तनाचे साधन आहे : डॉ. एल. बी. डोंगरे




**तभा वृत्तसेवा**
**हिमायतनगर, दि. २७ नोव्हेंबर** -

येथिल हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालया मध्ये महाविद्यालयाच्या आदरणीय प्राचार्या डॉ. उज्वला सदावर्ते मॅडम यांच्या मार्गदर्शना खाली राज्यशास्त्र विभागाच्यावतीने संविधान दिनाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला भारतीय संविधानकार राष्ट्रनिर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर व हुतात्मा जयंतराव पाटील या दोन महान विभूतिंच्या प्रतिमांच्या पूजना नंतर मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. तद्नंतर उपस्थित सर्वांनी भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षीय स्थान स्टॉफ सेक्रेटरी प्रा. डॉ. डि. के. कदम सर यांनी भूषविले. तर प्रमुख पाहुणे म्हणून राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख व कार्यक्रमाचे संयोजक प्राध्यापक डॉ. एल. बी. डोंगरे सर हे लाभले होते. व तसेच मंचावर प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. शेख शहनाज व तसेच सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. सविता बोंडारे मॅडम याही उपस्थित होत्या.

मंचावरून बोलताना कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. एल. बी. डोंगरे सर म्हणाले की, संविधानामुळे आपल्या देशाची एकता, एकात्मता व अखंडता अबाधित आहे. आपल्या येथिल जातीपाती मध्ये विखुरल्या जिवन शैलीला संविधानाने एका समतेच्या सुत्रामध्ये बांधण्याचे काम केले. म्हणून भारतीय संविधान हा एक ग्रंथ नसून तो एक सामाजिक दस्तावेज आहे.

या ठिकाणी डॉ. शेख शहेनाज यांनी ही आपले मत व्यक्त केले. कार्यक्रमाचा अध्यक्षिय समारोप करत असताना डॉ. डी. के. कदम सर यांनी भारतीय संविधान व संविधानाचे कलम याविषयी सखोल असे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इतिहास विभागाचे प्रमुख डॉ. वसंत कदम यांनी केले. तर आभार प्रदर्शन हिन्दी विभागाचे प्रमुख डॉ. शिवाजी भदरगे यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे संपूर्ण शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

देशोन्नता

# 'हुजपा' मध्ये रंगनाथन यांची जयंती साजरी



देशोन्नती वृत्तसंकलन...

**हिमायतनगर** ■ येथील हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालयातील ग्रंथालय विभागाच्या वतीने डॉ. एस. आर. रंगनाथन यांची जयंती प्राचार्या डॉ. उज्वला सदावर्ते यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे मान्यवरांनी पूजन केले. तदनंतर या प्रसंगी डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जीवन कार्यावर ग्रंथालयाचे ग्रंथपाल प्रा. राजू बोंबले यांनी मार्गदर्शन केले. डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. एल. बी. डोंगरे यांनी प्रकाशित 'दलित राजकीय नेतृत्व' व 'राष्ट्रनिर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या पुस्तकाच्या प्रती ग्रंथालयास भेट दिल्या. डॉ. डोंगरे यांना ग्रंथालय विभागाच्या वतीने सन्मान पत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे स्टाफ सेक्रेटरी डॉ. डी. के. कदम, कार्यक्रमाधिकारी डॉ. शिवाजी भदरगे, प्रा. मुकेश यादव, डॉ. गजानन दगडे, डॉ. संघपाल इंगळे, प्रा. महेश वाकडकर, प्रा. आशिष दिवडे, डॉ. श्याम इंगळे, प्रा. पवार, डॉ. सय्यद जलील, डॉ. सविता बोंढारे, प्रा. आगलावे मॅडम व कार्यालयीन कर्मचारी तसेच विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

Nanded Edition
Aug 12, 2022 Page No. 7



महाविद्यालय ग्रंथालय विभागाच्या वतीने आयोजित रंगनाथन जयंती निमित्त पुस्तक भेट करतांना

नांदेड ◆शुक्रवार, दिनांक २० डिसेंबर २०१९ ◆वर्ष ०७ वे । अंक : ३४७ वा ◆पाने १२ ◆किंमत : ४ रुपये

पुरोगामी विचाराचे

# एकमत


संस्थापक : विलासराव देशमुख

शेअर बाजार ▶BSE-41,674(115) ▶NSE-12,260(38) डॉलर (रुपयात) ▶चल

## भारतीय राज्यघटनेने अल्पसंख्याकांच्या हक्कांचे रक्षण केले : डोंगरे



हिमायतनगर : येथील हुतात्मा जयवंतराव पाटिल महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागा कडून अल्पसंख्याक दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. डी. के. कदम सर हे उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. एल. बी. डोंगरे सर हे लाभले होते. प्रा. डॉ. एस. व्ही. जाधव सर व तसेच सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. मुकेश यादव सर आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. या कार्यक्रमाची सुरुवात म. गांधी व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवाच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले. भारतामध्ये अल्पसंख्याक व्यक्तिंना सामाजिक, धार्मिक, राजकीय क्षेत्रात समान संधी मिळाली आहे. म्हणून आपल्या देशातील अल्पसंख्याक सुरक्षीत असुन त्यांचे स्वातंत्र अबाधित आहे. असे महत्त्व पुर्ण विचार मांडले. व त्यानंतर अध्यक्षिय समारोपातुन प्रा. डॉ. डी. के. कदम सर यांनी विद्यार्थ्यांना मोलाचं मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागाचे प्रा. डॉ. शिवाजी भदरगे यांनी केले. तर आभार प्रा. डॉ. शेख शहेनाज यांनी मानले.




महाविद्यालयात पी.पी.टी.द्वारे अध्यापन करतांना


मराठवाडा ग्रामीण शिक्षण संस्था संचलित ...
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर
राज्यशास्त्र विभाग
सेमीनार
प्राचार्य


मराठवाडा ग्रामीण शिक्षण संस्था संचलित ...
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर
राज्य
विभाग
सेमीनार


मराठवाडा ग्रामीण शिक्षण संस्था संचलित ...
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर
राज्यशास्त्र विभाग
सेमीनार
प्राचार्य


मराठवाडा ग्रामीण शिक्षण संस्था संचलित ...
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर
राज्यशास्त्र विभाग
सेमीनार
डॉ. उज्ज्वला सदावर्ते
प्राचार्या
डॉ. डोंगरे एल. बी.
राज्यशास्त्र विभाग प्रमुख


मराठवाडा ग्रामीण शिक्षण संस्था संचलित ...
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर
राज्यशास्त्र विभाग
सेमीनार
डॉ. उज्ज्वला सदावर्ते
प्राचार्या
डॉ. डोंगरे एल. बी.
राज्यशास्त्र विभाग प्रमुख


मराठवाडा ग्रामीण शिक्षण संस्था संचलित ...
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर
राज्यशास्त्र विभाग
सेमीनार







महाविद्यालयात हर घर तिरंगा मोहीमे अंतर्गत तिरंगा ध्वजाचे वाटप करतांना

नांदेड Live
देशोन्नती
सोमवार, दि. २७ नोव्हेंबर २०२३ https://www.deshonnati.com

# हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालयात संविधान दिनाचे आयोजन

देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ▪ हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालयात संविधान दिनाचे आयोजन हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय हिमायतनगर येथे महाविद्यालयाच्या प्राचार्या उज्वला सदावर्ते यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यशास्त्र विभागाच्या वतीने संविधान दिनाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून २६/११ हल्ल्यातील शहिदांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

सदरील कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे इंग्रजी विभागाचे प्रा.गुंडाळे एम.पी. हे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून इतिहास विभाग प्रमुख डॉ.वसंत कदम हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व घटनेच्या प्रास्ताविकाचे वाचन राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ.डोंगरे एल.बी. यांनी केले तर प्रमुख मार्गदर्शक डॉ.वसंत कदम म्हणाले सामाजिक राजकीय आर्थिक न्याय निर्माण करणे हा घटनाकारांचा उद्देश होता . घटनेने या देशांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा निर्माण करून गोंधळात टाकणारी विविधता असणाऱ्या देशात एकता एकात्मता, बंधुभाव निर्माण केला म्हणून हे संविधान हा देशाचा सर्वोच्च ग्रंथ आहे असे म्हणाले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन राज्यशास्त्र विभागाचे प्रा.पंडित हाके यांनी केले. या



कार्यक्रमास महाविद्यालयातील डॉ. श्याम इंगळे, डॉ. संघपाल इंगळे, प्रा. विश्वनाथ कदम आणि साहेबराव आसलकर, विश्राम देशपांडे, राजू डोंगरगावकर, प्रभू पोराजवार आणि राहुल भरणे तसेच महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, विद्यार्थीनी उपस्थित होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

पुरोगामी विचाराचे एकमत

# नांदेड NEXT

सोमवार, दि. २७ नोव्हेंबर २०२३ epaper http://www.dainikekmat.com

# जिल्ह्यात संविधान दिन उत्साहात साज

## ▶ शाळा महाविद्यालय, शासकीय, निमशासकीय कार्यालयांत कार्यक्र

**नांदेड :एकमत चमू**

**भारतीय संविधान दिन जिल्ह्यामध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला ग्रामपंचायत कार्यालय, शाळा महाविद्यालय, शासकीय निम शासकीय कार्यालयात संविधान दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मुंबई येथील २६ \११ मधील दहशदवाली हल्ल्यात तील शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करून संविधान दिन साजरा करण्यात आला.**



## ह. ज. पा. महाविद्यालयात संविधान दिन साजरा

**हिमायतनगर : प्रतिनिधी**

शहरातील हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय ,हिमायतनगर येते महाविद्यालयाच्या प्राचार्या उज्वला सदावर्ते यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यशास्त्र विभागाच्या वतीने संविधान दिनाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून २६/ ११च्या हल्ल्यातील शहिदांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सदरील कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे इंग्रजी विभागाचे प्रा.गुंडाळे एम.पी. हे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून इतिहास विभाग प्रमुख डॉ.वसंत कदम हे उपस्थित होते .कार्यक्रमाचे प्रास्ताविक व घटनेच्या प्रास्ताविकाचे वाचन राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ.डोंगरे एल.बी.यांनी केले तर प्रमुख मार्गदर्शक डॉ.वसंत कदम म्हणाले सामाजिक राजकीय आर्थिक न्याय निर्माण करणे हा घटनाकारांचा उद्देश होता .

घटनेने या देशांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा निर्माण करून गोंधळात टाकणारी विविधता असणाऱ्या देशात एकता एकात्मता, बंधुभाव निर्माण केला .म्हणून हे संविधान हा देशाचा सर्वोच्च ग्रंथ आहे असे म्हणाले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन राज्यशास्त्र विभागाचे प्रा.पंडित हाके यांनी केले .या कार्यक्रमास महाविद्यालयातील डॉ. श्याम इंगळे, डॉ. संघपाल इंगळे, प्रा. विश्वनाथ कदम आणि श्री.साहेबराव आसलकर.विश्राम देशपांडे. राजू डोंगरगावकर प्रभू पोराजवार आणि राहुल भरणे तसेच महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली